नि. दि. दा. क्र. १३१/२०२०

(शिवम आनंद यलमार वगैरे वि. आनंद मुरलीधर यलमार )

## निशाणी क्र.०५ वर आदेश

०१. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरूध्द तुर्तातुर्त ताकीदीसाठी दाखल केला आहे.

०२. वादीच्या म्हणण्यानुसार वादीने प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीविरूध्द दावा कलम १अ ते १क मध्ये नमूद मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होवून पृथकपणे कब्जा मिळणेसाठी दाखल केला आहे. वादी क्र. २ व प्रतिवादी हे नात्याने पती–पत्नी असून वादी क्र. १ हा वादी क्र. २ व प्रतिवादी यांचा मुलगा आहे. वादी क्र. २ ही बरेच दिवसापासून वादी क्र. १ याचेजवळ सुपली येथे राहत आहे. वर नमूद मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटूंबाच्या वडिलार्जित समाईक मालकी वहिवाटीच्या आहेत. त्याचे अदयापपावेतो वाटप झालेले नाही. अशा परिस्थितीत दावा मिळकतीवर प्रतिवादी याचे नाव असलेचा गैरफायदा घेवून प्रतिवादी हा दावा मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे तसेच, वादींचा दावा मिळकतीतील अविभक्त, समाईक हिस्सा बुडवण्याच्या प्रयत्नात आहे. त्यामुळे वादी यांनी दिनांक १५/०२/२०२० रोजी प्रतिवादीस दावा मिळकतीतील त्यांचा हिस्सा मागितला असता त्याने वादीस स्पष्टपणे नकार देवून वादीस "जमिनी माझे नांवावर आहेत, मी जमीनी विकणार आहे, तुला काय करायचे ते कर"असे म्हणून आरेरावीची भाषा वापरली. त्यामुळे वादी यांना दावा मिळकतीतील त्यांचा हिस्सा एकत्रात ठेवणे धोक्याचे वाटू लागलेने त्यांनी दावा वाटपासाठी दाखल केला आहे.

०३. दरम्यानच्या कालवधीमध्ये प्रतिवादी दावा मिळकतीमध्ये ति–हाईत इसमाचे हक्क निर्माण करण्याची भिती वादींना वाटत असल्यामुळे वादींनी प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज प्रतिवादीविरूध्द दाखल केला आहे.

०४. प्रस्ततुतकामी प्रतिवादी हजर न झाल्याने सदरचा दावा प्रतिवादीविरूध्द एकतर्फा चालवण्याचा आदेश दिनांक ०४/०२/२०२१ रोजी निशाणी क्र. १ वर करण्यात आला

आहे.

०५. अभिलेखावरील संपूर्ण कागदपत्रे वादीचा निशाणी ०५ कडील अर्ज प्रतिवादीचे त्यावरील म्हणणे विचारत घेता खालील प्रमाणे वाद प्रश्न निश्चित होत असून त्यांची कारणमिमांसा पुढीलप्रमाणे करून त्याची उत्तरे निर्धारित केली आहेत. कारणमिमांसेसह खाली नोंद केले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादी निशाणी क्र. ०५ च्या अर्जाने सकृतदर्शनी केस त्यांच्या हक्कात असल्याचे सिध्द करतात काय? | होय. |
| ०२. | वादी निशाणी ०५ अर्जाद्वारे तुलनात्मक दृष्टया न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे सिध्द करतात काय? | होय. |
| ०३. | वादीचा निशाणी ०५ चा अर्ज नामंजुर झाल्यास त्यांचे अपरिमीत नुकसान होईल ही बाब सिध्द करतात काय ? | होय. |
| ०४. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांस

०६. वादीने निशाणी क्र. ४ सोबत मौजे भंडीशेगांव येथील गट नं. ५५८/१/ब/३ चा उतारा, १७२, ४८ चे ७/१२ चे उतारे व वादी क्र. १ चा जन्माचा दाखला व कि फौ अर्ज नं. ५८९/१२ च्या निकालाची प्रत दाखल केली आहे. तसेच, निशाणी ११ सोबत फेरफार नं. ४८८७, ८०१३, ८०१७, ७८३० चे उतारे व रजि. दस्त नं. १४७२/०५, ३०७६/१७ व ३१८२/१७ चे खरेदीखताच्या प्रती दाखल केल्या आहेत.

०७. अर्जाचा गुणवगुणावर विचार करण्यापूर्वी ही बाब नमूद करणे गरजेचे आहे की, अभिलेखावर दाखल कागदपत्रे कोणत्याही औपाचारिक पुराव्याशिवाय सदरच्या अर्जावर आदेश करताना विचारात घेता येतील.

०८. दावा मिळकत वादी प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटुंबाच्या वडिलार्जित मालकी वहिवाटीची असलेमुळे दाव्याचा निकाल होईपावेतो प्रतिवादीने त्यांची विल्हेवाट लावू नये, विक्री, हस्तांतर करू नये अशी वादींची विनंती आहे.

०९. प्रतिवादी दाव्याच्या कामी हजर न झाल्याने दावा एकतर्फी चालवण्याचा आदेश दिनांक ०४/०२/२०२१ रोजी निशाणी क्र. १ वर करण्यात आला आहे.

१०. प्रतिवादीने वादी सोबतचे नाते नाकरले नाही. उलट वादीने वादी क्र. १ च्या जन्माचा दाखला कामी निशाणी ४/४ कडे दाखल केले आहे. तसेच, फौजदारी कि. अर्ज ५८९/१२ चा न्यायनिर्णयही दाखल केला आहे. त्यावरून वादी नं. १ प्रतिवादीचा मुलगा व वादी नं. २ त्याची पत्नी असल्याचे दिसून येते.

११. दावा मिळकत गट नं. ४८, १७२ व ५५८/१/ब/३ या प्रतिवादींच्या नावे नमूद असल्याचे निशाणी क्र. ०४ सोबत दाखल ७/१२ चे उतारेवरून प्रथमदर्शनी दिसून येते. दावा मिळकती हया वडिलार्जित असलेबाबत दर्शविण्यासाठी वादीने अभिलेखावर निशाणी ११/७ कडे गणेश महादेव यलमार यांना गट नं. १७२ पैकी खरेदी दिलेल्या जमिनीचे खरेदीखताची सही शिक्क्याची नक्कल दाखल केली. सदरच्या खरेदीखताचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादीने भंडीशेगाव येथील गट नं. १७२ ची जमिन ही त्यांची वडिलार्जित जमिन असल्याचे व सदरचे जमिनीतील क्षेत्र भंडीशेगाव येथील गट नं. ४८ क्षेत्र २ हेक्टर ४० आर ची जमिन खरेदी करण्यासाठी पैशाची आवश्यकता असल्याचने विक्री केल्याचे स्पष्ट नमूद केले आहे. यावरून प्रथमदर्शनी वादींनी दावा मिळकत गट नं. १७२ ची जमिन ही प्रतिवादींची वडिलार्जित जमीन असल्याचे सिध्द केले आहे. अर्थातच खरेदीखतात नमूद केलयाप्रमाणे वडिलार्जित जमिन विक्री करून खरेदी केलेली गट नं. ४८ ची

जमिनही वडिलार्जित असल्याचे वादी प्रथमदर्शनी सिध्द करतो. उर्वरित दावा मिळकत गट नं. ५५८/१/ब/३ याबाबतचे कथन प्रतिवादीने दाव्यात हजर होवून नाकारले नसल्याने प्रतिवादी या अर्जाकरिता सदरची जमिनही वडिलार्जित असल्याचे प्रथमदर्शनी शाबीत करतो. त्यामुळे वादीने प्रथमदर्शनी दावा मिळकती हया वडिलार्जित असल्याचे शाबीत केले आहे. त्याचबरोबर वादी क्र. २ ने निशाणी क्र. ५ च्या पुष्ठर्थ निशाणी ६ कडे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. प्रतिवादी दाव्यात हजर न झाल्याने वादीचे अर्जातील व प्रतिज्ञापत्रातील मजकुर नाकारला गेला नाही. त्यामुळे त्यावर अविश्वास ठैवावा असा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर नाही.

१२. अभिलेखावरील कागदपत्रांवरून दावा मिळकती हया वडिलार्जित असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केल्याने वादीकडे प्रथमदर्शनी केस आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादीने दावा मिळकतीची विक्री केली तर वादींचे दाव्यामध्ये गुंतागुंत वाढणार असून वादींचे नुकसान होणार आहे. उलट विक्री केली नाही तर प्रतिवादीला नुकसान होणार नाही. वाद मिळकती वडिलार्जित असल्याचे वादीने प्रथमदर्शनी सिध्द केल्याने न्यायाचा समतोल वादीचे बाजूने आहे व त्यामुळे वरील कारणांचा विचार करता मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नमूद करून मुद्दा क्र. ४ साठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| अनु क्र. १ | **आदेश** |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | दाव्याच्या अंतिम निर्णयापर्यंत प्रतिवादी किंवा त्यांचे तर्फे हक्क सांगणारा इसम यांनी दावा मिळकतीची विक्री, हसतांतर विल्हेवाट करू नये अथवा त्रयस्थ इसमांचे हक्क अधिकार प्रस्थापित करू नये, अशी तुर्तातुर्त ताकीद देण्यात येते. |

| | |
|---|---|
| ३. | या अर्जाचा खर्च अंतिम निर्णयाच्या वेळी दाव्याचा निकाल ज्याच्या पक्षात होईल त्यांना देण्यात यावा. |
| | (आदेश खुल्या न्यायादालनात जाहीर.) |

स्वाक्षरी/-

( एम. आर. कामत )

दिनांकः-२०/१२/२०२१. प्रभारी ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

पंढरपूर.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment / Order.

| | | |
|---|---|---|
| Court | : | Jt. C. J. J. D. & J. M. F. C. Pandharpur |
| Name of Stenographer | : | M. P. Gheradi. |
| Date | : | 20.12.2021. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 20.12.2021. |
| Judgment/Order uploaded on | : | 21.12.2021. |